महिला व बाल विकास विभागाच्या योजनेशी अभिसरण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)
शासन शुध्दीपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र.०१/रोहयो-१
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०३ जुलै, २०१७

**संदर्भ** :- शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक २१ सप्टेबर, २०१५

**शुध्दीपत्रक :-**

महिला व बाल विकास विभागाच्या योजनेशी अभिसरण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतीची बांधकामे करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

२. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४ व त्यातील अनु. क्र. १३ व १४ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे :-

अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम हे इतर योजनांशी अभिसरण करून करावयाचे असल्याने सदर कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा पंचायत समिती स्तरावरील बांधकाम विभागाची राहील. तथापि खालील बाबींचे पालन करणे अनिवार्य राहील.

१३) अंगणवाडी केंद्राच्या प्रत्येक बांधकामाला प्रशासकीय मान्यता तहसिलदार प्रदान करतील व तांत्रिक मान्यता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी देतील.

१४) अंगणवाडी केंद्राच्या बांधकाम करण्याचे कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा ही महिला व बाल विकास विभाग राहील.

**याऐवजी असे वाचावे :-**

अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम हे इतर योजनांशी अभिसरण करून करावयाचे असल्याने सदर कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा ग्रामपंचायत राहील.

१३) अंगणवाडी केंद्राच्या प्रत्येक बांधकामाला प्रशासकीय मान्यता गट विकास अधिकारी, पंचायत समिती प्रदान करतील व तांत्रिक मान्यता उपअभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद देतील. तांत्रिक

मान्यता प्रदान करताना अंदाजपत्रकात महात्मा गांधी नरेगा योजना व अभिसरण करण्यात आलेल्या योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीचा उल्लेख करावा. अंगणवाडी केंद्राची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मान्यता घ्यावी.

१४) अंगणवाडी केंद्राचे बांधकाम करण्याच्या कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा ग्रामपंचायत राहील.

३. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ५ मध्ये खालील बाब अंतर्भूत आहे :-

कामास प्रशासकीय मान्यता तहसिलदार यांनी प्रदान करावी. तहसिलदार यांनी सदर काम लेबर बजेटमध्ये समाविष्ट असल्याचे व सदर कामास ग्रामसभेची मान्यता प्राप्त असल्याची / ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त असल्याची खात्री करावी.

**याऐवजी असे वाचावे :-**

कामास प्रशासकीय मान्यता नियमित कार्यपध्दतीप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रदान करावी. मान्यता प्रदान करताना महात्मा गांधी नरेगा योजनेच्या सर्व निकषांची पूर्तता करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहील. गट विकास अधिकारी यांनी सदर काम लेबर बजेटमध्ये समाविष्ट असल्याचे व सदर कामास ग्रामसभेची मान्यता प्राप्त असल्याची / ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त असल्याची खात्री करावी. तालुक्याच्या पूर्ण यादीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मान्यता घ्यावी.

४. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ मध्ये खालील बाब अंतर्भूत आहे :-

तहसिलदार यांनी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात यावी. हजेरीपत्रकाची पडताळणी झाल्यानंतर मजुरांना त्यांची मजुरी बँक / पोस्ट खात्यातून तहसिलदार यांच्यामार्फत प्रदान करण्यात येईल. साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या पंचायत समितीचे उपअभियंता, बांधकाम विभाग यांनी तहसिलदार यांना सादर केल्यानंतर तहसिलदार जिल्हा स्तरावरील मजुरी साहित्याचे ६० : ४० प्रमाण विचारात घेतील व मजुरी साहित्याच्या ६० : ४० प्रमाणात साहित्यावरील खर्च संबंधित विभागास ईएफएमएस द्वारे किंवा चेकद्वारे अदा करतील.

**याऐवजी असे वाचावे :-**

गट विकास अधिकारी यांनी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ग्रामपंचायतीने कामास प्रत्यक्ष सुरुवात करावी. हजेरीपत्रकाची पडताळणी झाल्यानंतर मजुरांना त्यांची मजुरी बँक / पोस्ट खात्यातून गट विकास अधिकारी यांच्यामार्फत प्रदान करण्यात येईल. साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी यांना सादर केल्यानंतर गटविकास अधिकारी जिल्हा स्तरावरील मजुरी साहित्याचे

६० : ४० प्रमाण विचारात घेतील व मजुरी साहित्यांच्या ६० : ४० प्रमाणात साहित्यावरील खर्च संबंधित ग्रामपंचायतीस ईएफएमएस द्वारे अदा करतील.

५. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ८ खालीलप्रमाणे आहे :-

सदर कार्यक्रमाचे देखरेख व संनियंत्रण उपजिल्हाधिकारी (रोहयो) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद यांनी संयुक्तपणे करावे. तसेच योजनेचा दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा व त्याचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर, नियोजन (रोहयो) विभाग व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना न चुकता सादर करावा.

**याऐवजी असे वाचावे :-**

सदर कार्यक्रमाचे देखरेख व सनियंत्रण उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा / ग्रा. पं.) यांनी संयुक्तपणे करावे. तसेच योजनेचा दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा व त्याचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर, नियोजन (रोहयो) विभाग व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत न चुकता सादर करावा.

६. संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ९ खालीलप्रमाणे आहे :-

साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या बांधकाम विभागाकडून तहसिलदार यांचेकडे सादर करण्यात येतील. एकूण खर्चापैकी महिला व बाल विकास विभागाने भरावयाच्या खर्चाचे देयक बांधकाम विभागाकडून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावे व त्याप्रमाणे या खर्चाची रक्कम त्यांच्याकडून तहसिलदार यांना देण्यात येईल.

**याऐवजी असे वाचावे :-**

साहित्यावरील होणाऱ्या खर्चाच्या पावत्या ग्रामपंचायतीकडून गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येतील. त्याप्रमाणे खर्चाची रक्कम ग्रामपंचायतीस ईएफएमएस द्वारे अदा करण्यात येईल.

७. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, याचा संगणक संकेतांक २०१७०५२३१३४००७९११६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. प्रमोद शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

मा. राज्यपालांचे सचिव

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग
सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
सर्व तहसीलदार
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, नियोजन (रोहयो) / वन विभाग
उपसचिव (कार्यासन ६) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (मग्रारो-१).